मुंबई मेट्रो-२अ (दहिसर (पू) - डी.एन.नगर) प्रकल्पाकरिता राज्यशासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१८/प्र.क्र.१४८/भाग-३/नवि-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २६ मार्च, २०१९

पहा :-

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.एमआरडी-३३१५/प्र.क्र.११३/नवि-७, दिनांक १७ ऑक्टोबर,२०१५.
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.एमआरडी-३३१७/प्र.क्र.१३८/नवि-७, दिनांक २ नोव्हेंबर, २०१८.
३. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
४. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक बीयुडी-.२०१८/प्र.क्र.५५/नवि-४, दिनांक ०३ एप्रिल, २०१८
५. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक पूरक-२०१८/प्र.क्र.९५/अर्थ-३, दिनांक २७ जुलै, २०१८
६. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक पूरक-२०१८/प्र.क्र.१३८/नवि-४, दिनांक १८ ऑगस्ट, २०१८
७. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९.
८. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८ मार्च,२०१९.

प्रस्तावना :

मुंबई मेट्रो लाईन-२ (दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द) प्रकल्पाचा टप्पा-१ (दहिसर (पू) - डी.एन.नगर) या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पास राज्य मंत्रीमंडळाने दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १७/१०/२०१५ अन्वये सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, केंद्र व राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य व वित्तिय संस्थेचे कर्ज सहाय्य या माध्यमातून निधी उभारून करावयाची आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या समभागाचा रू. १८९२ कोटी रकमेचा हिस्सा राज्य शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वहन करावयाचा आहे. राज्य शासनामार्फत केंद्रीय करांच्या ५०% रु.२९२.५० कोटी आणि राज्यस्तरीय/स्थानिक करांकरिता रु.४६५ कोटी असे रु. ७५७.५० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य रूपाने निधी उपलब्ध करावयाचा आहे. सदर दुय्यम कर्ज सहाय्याची परतफेड प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावयाची आहे. या प्रकल्पात राज्य शासनाच्या वतीने जमीन स्वरुपातील सहाय्य देखिल उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पासाठी वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घ्यावयाचे असून कर्जाची परतफेड प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने करावयाची आहे.

मुंबई मेट्रो-२अ (दहिसर (पू) - डी.एन.नगर) या प्रगतीपथावरील प्रकल्पाकरिता जुलै, २०१८ पावसाळी अधिवेशनामध्ये पूरवणी मागणीद्वारे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य या प्रयोजनाकरिता रु.४७.९७ कोटी इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. उक्त तरतूदीमधून रु. ४७.९७ कोटी इतकी रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज म्हणून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१. मुंबई मेट्रो-२अ (दहिसर (पू) - डी.एन.नगर) प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज म्हणून रु. ४७,९७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस कोटी सत्याण्णव लाख फक्त) इतकी रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्रदान करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रक्कम “मागणी क्र. एफ-७ ६२१७-नगर विकासासाठी कर्जे ६०, इतर नगर विकास योजना १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे-राज्य योजना (००)(०३) मुंबई मेट्रो-२अ रेल्वे प्रकल्पाकरिता एमएमआरडीएला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज ५५ कर्जे व आगाऊ रकमा सांकेतांक क्र. (६२१७०८३२) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची घालण्यात यावी.

३. उपरोक्त लेखाशीर्ष उपयोगात आणण्यासाठी नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी, नवि-५, यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. शासन निर्णयातील परिच्छेद -१ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून काढून ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. नगर विकास विभागाच्या रोख शाखेने देयक तयार करुन ते अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे पाठवावे. याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही नवि- ३१ कार्यासनाने करावी.

४. राज्यशासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य म्हणून वितरीत केलेली उपरोक्त रु.४७.९७ कोटी रक्कम मुंबई मेट्रो-२अ (दहिसर (पू) -डी.एन.नगर) प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत केंद्रीय व राज्यस्तरीय/स्थानिक कर याकरिता झालेल्या खर्चाची असल्याने सदर रकमेचा विनियोग अन्य प्रयोजनासाठी करण्यात येऊ नये.

५. राज्यशासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य म्हणून वितरीत उपरोक्त रक्कम रु.४७.९७ कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सदर प्रकल्पासाठी बाह्य वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर वसूल करावयाची आहे.

६. सदर कर्ज सहाय्याच्या रक्कमेवर भविष्यात व्याज आकारणी करण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यास कर्जाची परतफेड त्याच्या व्याजाच्या रक्कमेसह सदर प्रकल्पाचे मुख्य कर्जाची परफेड केल्यानंतर एका हप्त्यात करण्यात यावी.

७. मुंबई मेट्रो-२अ (दहिसर (पू) - डी.एन.नगर) प्रकल्पाकरिता राज्यशासनाकडून केंद्रीय व राज्यस्तरीय करापोटी येणाऱ्या खर्चासाठी प्राप्त झालेली रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे जमा झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

८. सदर रक्कम वितरीत झाल्यानंतर या रक्कमेतून खर्च केलेल्या रक्कमांचा तपशिल राज्य शासन व केंद्रशासन यांना सादर करण्यात यावा.

९. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून तसेच राज्यशासनामार्फत केंद्रीय व राज्यस्तरीय/ स्थानिक करापोटी येणाऱ्या खर्चासाठी प्राप्त होणाऱ्या रक्कमांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वतंत्र लेखे ठेवावेत.

१०. राज्यशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सदर कर्जसहाय्यासाठी राज्यशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कर्जा विषयीच्या इतर संबंधीत अटी व शर्ती लागू राहतील.

११. सदर रक्कम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केली आहे ती त्याच प्रयोजनासाठी खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सादर करावे.

१२. सदर कर्ज सहाय्याच्या वितरणाबाबत शादिक-२०१२/प्र.क्र.४९/ऋण व हमी दिनांक ३०/१२/२०१४ मधील सूचनानुसार महाऋण आज्ञावलीत **जोडपत्र-अ** (सोबत जोडले आहे) नुसार माहिती भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

१३. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ मधील परिच्छेद क्र. ७ मधील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टातील नमूद केलेल्या बाबींच्या तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची पूर्तता होत आहे.

१४. सदरचा निधी वितरण आदेश वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९ व वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४२/ अर्थ-३, दिनांक ०८ मार्च,२०१९ मधील नमूद तरतूदीनुसार वितरीत करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३२६१७०६५२७०२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.04.04 15:47:27 +05'30'

(वि.श्री. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.
३. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
४. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
५. महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
६. निवासी अधिदान व लेखा अधिकारी, (लेखा परीक्षा), मुंबई.
७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ३२ .
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९. वित्त विभाग कार्यासन- व्यय-३, अर्थसंकल्प-१६, अर्थसंकल्प-३.

१०. नियोजन विभाग (कार्यासन १४४४)
११. उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. कक्ष अधिकारी नवि-४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ .
१३. रोख शाखा (५ प्रती),
१४. निवड नस्ती, नवि-७.

जोडपत्र-अ

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-२ टप्पा-१ (दहिसर (पू) - डी.एन.नगर) या प्रकल्पासाठी सन २०१८-१९ मध्ये रु.४७.९७ कोटीचे दुय्यम कर्ज सहाय्य वितरीत करण्याबाबत.

अ.क्र.	विवरण	माहिती
१.	संस्थेचे नांव	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१
२.	वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक व दिनांक	वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९ वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८ मार्च,२०१९
३.	कर्जाची एकूण मंजूर रक्कम	रु.७५७.५० कोटी
४.	मंजूर कर्जापैकी यापूर्वी कर्जाची रक्कम वितरीत करण्यात आली असल्यास वितरीत करण्यात आलेली कर्जाची रक्कम	नाही.
५.	मंजूर कर्जापैकी सदर शा.नि. अन्वये वितरीत करण्यात येत असलेली कर्जाची रक्कम	रु.४७.९७ कोटी
६.	एकापेक्षा अनेक सहकारी संस्था, व्यक्ती/यांना कर्ज मंजूर करण्यात आले असल्यास त्यांच्या नावासमोर, कर्ज मंजूरी रक्कम नमूद करण्यात यावी	-
७.	एकूण कर्ज परतफेडीचे हप्ते	मुख्य कर्जाची परतफेड झाल्यावर दुय्यम कर्जाची परतफेड संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने करावयाची आहे. मुख्य कर्जाबाबत निर्णय झाल्यावर वित्त विभागाच्या सहमतीने सदर दुय्यम कर्जाच्या परतफेडीचा कालावधी निश्चित करण्यात येईल.
८.	कर्ज परतफेडीचे हप्त्याची रक्कम	रु.४७.९७ कोटी
९.	कर्ज परतफेडीचे हप्त्याच्या कालावधी, जसे वार्षिक/सहामाही/त्रैमासिक इत्यादी	अनुक्रमांक ७ प्रमाणे

१०.	कर्ज परतफेडीसाठी सवलतीचा कालावधी (Moratorium Period)	अनुक्रमांक ७ प्रमाणे
११.	कर्ज परतफेडीसाठी हप्त्याच्या निश्चित केलेला कर्ज हप्त्याचा दिनांक	अनुक्रमांक ७ प्रमाणे
१२.	कर्ज परतफेडीच्या पहिल्या हप्त्याचा दिनांक	अनुक्रमांक ७ प्रमाणे
१३.	कर्ज परतफेडीच्या शेवटच्या हप्त्याचा दिनांक	अनुक्रमांक ७ प्रमाणे
१४.	व्याज दर	लागू नाही.
१५.	विलंब कालावधीसाठी दंडनीय व्याजदर व इतर आकार	लागू नाही.
१६.	व्याजाचा परतफेडीच्या हप्त्याचा कालावधी जसे वार्षिक/त्रैमासिक/सहामाही इत्यादी	लागू नाही.
१७.	कर्जाच्या खर्चाकरीता लेखाशिर्ष	"मागणी क्र. एफ-७ ६२१७- नगर विकासासाठी कर्जे , ८०, सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे राज्य योजना, (००) (०३) मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प-२अ करिता राज्य शासनाचे दुय्यम कर्ज ५५-कर्जे व आगाऊ रकमा सांकेतांक क्र.(६२१७०८३२)
१८.	कर्जाच्या वसूलीचे लेखाशिर्ष	नवीन लेखाशिर्ष घेण्यात येत आहे.
१९.	कर्जावरील व्याज/दंडनिय व्याज वसूलीचे लेखाशिर्ष	लागू नाही.
२०.	कर्जाशी संबंधित असलेल्या सहकारी संस्था यांचे पदनाम, पत्ता व दूरध्वनी क्रमांक	लागू नाही.
२१.	शासकिय कंपनीच्या नोडल ऑफीसचे पदनाम, पत्ता व दूरध्वनी क्रमांक	श्री. राजेंद्र गोटाफोडे, मुख्य लेखा अधिकारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई.
२२.	डी. डी.ओ.चा नंबर	कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. डी. डी.ओ. नंबर- ७१०१००२३०१